दिनांक :   .१.२०२०

प्रति,

माननीय मुख्यमंत्री,

गोवा राज्य.

**विषय : 'सनबर्न क्लासिक'च्या परिसरात तीन युवकांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणी आयोजकांवर गुन्हा नोंदवणे आणि'सनबर्न क्लासिक'सारख्या 'ई.डी.एम्.' महोत्सवांवर राज्यात कायमस्वरूपी बंदी आणणे यांविषयी....**

महोदय,

२७ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत वागातोर येथे संपन्न झालेल्या 'सनबर्न क्लासिक' महोत्सव परिसरात तीन युवकांचा मृत्यू झाल्याने गोव्याचे नाव पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर खराब झाले. तिन्ही युवकांचा मृत्यू हा अमली पदार्थाच्या अतीसेवनाने झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे, तर युवकांच्या शवचिकित्सा अहवालानंतर यामागील सत्य समोर येणार आहे.

२७ डिसेंबरला 'सनबर्न क्लासिक' महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी तिकीटासाठी रांगेत उभे राहिले असताना साईप्रसाद मलयाला (वय ३० वर्षे), वेंकट सत्यनारायण (वय २४ वर्षे) यांचा, तर २९ डिसेंबरला संदीप कोट्टा (वय २४ वर्षे) या पर्यटकाचा 'सनबर्न क्लासिक' महोत्सवाच्या ठिकाणीच मृत्यू झाला. यापूर्वी वर्ष २००९ मध्ये कांदोळी बीचवर झालेल्या 'सनबर्न' फेस्टिव्हलमध्ये नेहा बहुगुणा या २३ वर्षीय युवतीचा, तर वर्ष २०१४ मध्ये कांदोळी बीचवर झालेल्या 'सुपरसोनिक' या अशाच प्रकारच्या फेस्टिव्हलमध्ये ईशा मंत्री नावाच्या युवतीचा मृत्यू झाला होता. अशा महोत्सवांमुळे आतापर्यंत (निदर्शनास आलेल्या) ५ जणांचा बळी घेतला आहे. या सर्व घटनांमुळे परशुराम भूमी म्हणून गणल्या गेलेल्या गोव्याचे नाव 'अमली पदार्थ मिळणारे ठिकाण' म्हणून जगभर अपकीर्त झाले आहे. 'सनबर्न' फेस्टिव्हलची पार्श्वभूमी वादग्रस्त असल्याने आणि या महोत्सवाला सर्वत्र स्तरांवर विरोध होत असताना अशा महोत्सवाला परवानगी देऊ नये, अशी मागणी केली, आंदोलनेही केली, तरीसुद्धा या महोत्सवांना अनुमती दिली आणि त्याचे दुष्परिणाम समोर आहेत.

**※ गोव्यात होणाऱ्या 'सनबर्न' फेस्टिव्हलची वादग्रस्त पार्श्वभूमी :**

१. वर्ष २०१९ मध्ये 'सनबर्न क्लासिक' महोत्सवात तीन पर्यटकांचा अमली पदार्थाच्या अतीसेवनाने मृत्यू झाला.

२. वर्ष २०१३ मध्ये गोव्यातील वागातोर बीचवर आयोजित 'सनबर्न' फेस्टिव्हल मध्ये 'अंमली पदार्थविरोधी पथका'ने मारलेल्या धाडीमध्ये सौरभ अगरवाल नावाच्या ड्रग डिलरला चरससहित अटक करण्यात आली होती.

३. 'अमली पदार्थविरोधी पथका'ला याठिकाणी शेकडो जण सार्वजनिकरित्या हुक्का आणि चिलीम पित असतांना व अनेक जण तात्पुरत्या स्वरूपात बांधण्यात आलेल्या प्रसाधनगृहांत अंमली पदार्थांचे सेवन करत असतांना पहायला मिळाले. सहस्रो जणांकडून 'नो स्मोकिंग झोन'मध्ये धुम्रपान करण्यात येत होते; मात्र पोलिसांकडील दंड वसूल करण्याची पावती पुस्तके या वेळी संपली; पण धुम्रपान करणाऱ्यांची संख्या इतकी होती की, सर्वांकडून दंड वसूल करता आला नाही. यातून याची भीषणता लक्षात येईल.

४. 'सनबर्न'च्या आयोजकांनी भलेही हा 'ड्रग्ज-फ्री इव्हेंट आहे', असे सांगितले असले, तरी याठिकाणी अंमली पदार्थांच्या सेवनाचा मुक्त संचार असतो, हा पोलीस आणि अंमली पदार्थविरोधी पथक यांचा अनुभव आहे.

५. वर्ष २००९ मध्ये गोवा येथील कांदोळी बीचवर झालेल्या 'सनबर्न' फेस्टिव्हलमध्ये नेहा बहुगुणा या २३ वर्षीय युवतीचा मृत्यू झाला होता. बेंगळूरू येथे काम करणारी आणि देहली येथे रहाणारी नेहा ही 'अंमली पदार्थांच्या अतीसेवनामुळे मरण पावली', असे वैद्यकीय अहवालातून स्पष्ट झाले होते.

६. मुंबईस्थित फॅशन डिझायनर असलेल्या २७ वर्षीय युवतीचाही अंमली पदार्थांच्या अतीसेवनामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले होते. यातून या ठिकाणी किती मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांची विक्री-सेवन होते, हे लक्षात येते.

७. 'सनबर्न' फेस्टिव्हलच्या आयोजनामध्ये आणि अमली पदार्थांच्या विक्रेत्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विदेशी लोकही असतात; मात्र असे विदेशी हे केवळ 'टुरिस्ट व्हिसा' घेऊन भारतात आलेले असतात आणि याठिकाणी अनधिकृतपणे व्यवसाय करतात. अशांवरही काही कारवाई होतांना दिसत नाही.

८. वर्ष २०१३ चे 'सनबर्न' फेस्टिव्हल पार पडलेल्या बीचच्या परिसरातून 'अमली पदार्थविरोधी पथका'ने 'केटामीन' या 'डेट रेप ड्रग्ज'च्या (म्हणजे महिलांचे लैंगिक शोषण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ड्रग्जच्या) ४५० बाटल्या मिळाल्या. याचे मूल्य आंतरराष्ट्रीय बाजारात अनुमाने किंमत १ कोटी रुपये असावे.

९. अशाप्रकारे 'सनबर्न' फेस्टिव्हलचे आयोजन करणे हे समाजस्वास्थाला हानिकारक ठरत आहे. असे फेस्टिव्हल भरवून युवापिढी वाममार्गाला लावणे आणि भारतीय संस्कृती नष्ट-भ्रष्ट करण्याचे हे एक कारस्थानच आहे, असे म्हणावे लागेल.

१०. गोवा पोलिसांनी यापूर्वी 'सनबर्न' आणि 'सुपरसोनिक' या फेस्टिव्हलच्या आयोजनांसाठी ६०० पोलिसांचा फौजफाटा तैनात केला होता, त्यासाठीचे आयोजकांनी गोवा शासनाचा मनोरंजन कर, व्यावसायिक कर आदींसाठीचे कोट्यवधी रुपये वर्ष २०१० पासून देणे बाकी आहे. ते मिळत नसल्याने याविषयी एक जनहित याचिकाही दाखल झाली होती. त्यावर या आयोजकांकडून कोट्यवधी रुपयांचा कर वसूल करावा आणि मग कार्यक्रमांना अनुमती द्यावी, असा स्पष्ट आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपिठाने डिसेंबर २०१५ मध्ये गोवा शासनाला दिला होता. त्यामुळे या फेस्टिव्हलचे आयोजन गोव्यात न करता गेली काही वर्षे पुण्यात केले गेले. एका वृत्तानुसार 'सनबर्न'च्या आयोजकांची सुमारे ६ कोटी रुपये थकबाकी आहे. या थकबाकीविषयी सामाजिक कार्यकर्त्यांनी डिसेंबर २०१९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपिठाकडे दाद मागितल्यानंतर खंडपिठाने 'सनर्बन'च्या आयोजकांवर ताशेरे ओढून त्यांना महोत्सवाचे आयोजन करण्यापूर्वी सुमारे २ कोटी रुपये आगाऊ रक्कम शासनाकडे भरण्याचा आदेश देण्यात आला होता. न्यायालयाच्या आदेशानंतर महोत्सवाच्या आयोजकांनी ही रक्कम भरली.

११. प्रतिवर्षी सनबर्न फेस्टिव्हलमध्ये तिरंग्याचा अयोग्य पद्धतीने वापर केला जातो, तसेच तो अंगविक्षेप नाचगाणी करतांना अंगावर घेऊन नाचवला जातो. राष्ट्रध्वजाच्या आचारसंहितेप्रमाणे 'स्वतःच्या लाभासाठी राष्ट्रध्वजाचा वापर करून तिरंग्याला विकृत स्वरूपात प्रदर्शित करणे', हा दंडनीय गुन्हा आहे.

*** 'ईडीएम्'सारख्या महोत्सवात 'ट्रान्स म्युझिक' ऐकतांना 'मूड' वृद्धींगत करण्यासाठी 'एम्डीएम्ए' किंवा 'मॉली' यांसारख्या अमली पदार्थांचे काही जण सेवन करत असतात, हे 'ईडीएम्'चे आयोजकही मान्य करतात. 'ईडीएम्'मध्ये 'एम्डीएम्ए' या अमली पदार्थाचे सेवन होते, ही गोष्ट आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्ञात आहे.**

*** या पार्श्वभूमीवर आम्ही गोवा शासनाकडे पुढील मागण्या करत आहोत ...**

१. युवा पिढीला व्यसनाधीन बनवणारे आणि पाश्चात्य विकृतीचे उदात्तीकरण करणाऱ्या 'ईडीएम्' महोत्सवांना गोव्यात अनुमती देऊ नये. गोवा राज्य 'ईडीएम्'मुक्त करावे.

२. 'सनबर्न क्लासिक'च्या परिसरात तीन युवकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी आयोजकांवर गुन्हा नोंदवण्यात यावा. या प्रकरणाची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत करण्यात यावी.

३. या तिघांच्या मृत्यूचे कारण अमली पदार्थ असल्याचे स्पष्ट झाले असेल, तर त्याचा तपशील सार्वजनिक करावा. राज्यातील 'अमली पदार्थ विरोधी पथका'च्या वतीने आयोजकांवर त्यासंबंधी गुन्हा नोंद करण्यात यावा.

४. फेस्टीव्हलच्या काळात याविषयी 'अमली पदार्थ विरोधी पथका'ला हे का लक्षात आले नाही, कि त्यांच्या नाकाखालीच हे अपराध होत होते, यासाठी चौकशी समिती नेमून संबंधित उत्तरदायी अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी आणि दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

भारतीय युवापिढी दिवसेंदिवस अमली पदार्थांच्या आहारी जाण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. भारतीय युवापिढीला अंमली पदार्थांच्या गर्तेत ढकलून नासवणारे ‘सनबर्न’ फेस्टिव्हलला भारतातून कायमचे हद्दपार करून गोव्याची सांस्कृतिक अस्मिता जपावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स

प

क